REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख १२ जानेवारी, १९३८ | अंक २

"जो उठतो तो राजकारणांत पडतो, पण राजकारण म्हणजेच कांहीं सगळें कार्यक्षेत्र नव्हे. आपल्या लोकांनीं धंद्यांतही पडले पाहिजे."

"व्हाईटवे लेडलॉ, ईव्हान्स फ्रेजर वगैरे कंपन्या केवढाले व्यवहार करीत आहेत तिकडे आमचें लक्षच जात नाहीं. राजकीय हक्क आणि व्यापार हीं एकमेकांस सोडून कधींहि वृद्धिंगत व्हावयाचीं नाहींत." —लोकमान्य.

"केल्यानें होत आहे रे, आधीं केलेंच पाहिजे, प्रयत्नीं देव जाणावा, आधी केलाच पाहिजे." –श्रीसमर्थ.

## औद्योगिक मंडळ (लिमिटेड), पुणें

[ सन १९१३ व ३६ च्या कंपनी रजिस्ट्रार ॲक्टान्वयें नोंदलेलें. "प्रॉस्पेक्टस"ची मूळ प्रत मुंबईस मे. कंपनी रजिस्ट्ररसाहेब यांचेकडे नोंदली आहे. ]

**अधिकृत भांडवल रु. ५०००००**
**विक्रीस काढलेले रु. १०००००**
**अगर**
**१०००० भाग प्रत्येकीं रु. १० प्रमाणें**

३ रुपये अर्जाबरोबर. ३ रुपये मंजुरीचे वेळीं
३ रुपये पहिला हप्ता व १ भागीदाराजवळ रिझर्व्ह.
२५ भाग घेणारास डायरेक्टर होण्याची पात्रता येते. अर्जाचे नमुने कचेरींत महाराष्ट्र बँकेंत मिळतील.

**स्थापनेचे हेतुः—**

**मुख्य हेतुः**—हल्लीं व्यापारांत पडलेल्या लायक तरुण पिढीस मालाच्या रूपानें मदत देणें, उद्योग-शिक्षण मंदिरें स्थापणें, हुन्नरी माल बनविणें.

**अवांतर हेतुः**—मेमोरँडम ऑफ असोसिएशनमध्यें नमूद असलेल्या सर्व बाबी क्रमाक्रमानें सुरू करणें, संसारोपयोगी सर्व वस्तु, सोनें-नाणें, कापड-चोपड वगैरे व्यवहार करणें.

**संस्थेचा विशेषः**—इमारती अगर यंत्र-सामुग्री, यांत भांडवल न गुंततां तें प्रत्यक्ष उद्योग धंद्यांतच गुंतणार आहे. भागीदारांना कमींतकमी ५ टक्के तरी डिव्हिडंड देतां येई पावेतो मॅनेजिंग एजंटस हें सर्व काम "विनामूल्य" करणार आहेत.

**डायरेक्टर्स**

(१) रावसाहेब जी. के ऊर्फ **बाबासाहेब देशपांडे** रिटायर्ड डे. सु. पो. ग. आ. इंडिया, (चेअरमन)
(२) रावसाहेब **एस. एच. गद्गकर** रिटायर्ड रेल्वे ऑफिसर, (व्हाईस चेअर.)
(३) श्री. **डी. एल. परांजपे**, कॉन्ट्रॅक्टर, पुणें.
(४) श्री. **जी. डी. पोटभरे** लॅण्डलॉर्ड, पुणें.
(५) श्री. व्ही. के. जोशी हायकोर्ट प्लीडर ) एक्स-ऑफिशिओ.
(६) श्री. एम. जी. गोरे, रिटायर्ड रेल्वे ऑफिसर एक्स-ऑफिशिओ.

**बँकर्स**

धी बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें

**आडिटर्स :**

मि. जी. डी. आपटे, बी.ए., जी. डी. ए., आर.ए. रजिस्टर्ड अकौंटंटस

**कायद्याचे सल्लागार**

मि. एल. बी. ऊर्फ **अण्णासाहेब भोपटकर**, एम ए., एलएल बी.

**मॅनेजिंग एजंटस :**

मेसर्स **जनार्दन आणि कंपनी पुणें.**

कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिस "विश्राम-धाम" बिल्डिंग, (नेनेवाडा) १७७ सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें नं. २.

**नम्र व कळकळीची विनंति**

बंधु-भगिनींनो ! आपला सक्रीय हात प्रेमळपणानें पुढें करा, व आपल्या सुशिक्षित तरुणांना उद्योग धंद्यांना मदत देऊन स्वार्थ आणि परमार्थ दोन्हीहि साधा.

हल्लीची राजकीय परिस्थिती अत्यंत अनुकूल आहे त्याचा फायदा आपण घेऊन लोकमान्यांचें व श्रीसमर्थांचें म्हणणें खरें केलें पाहिजे.

पुणें हीच "दख्खनची दयाळबाग" करावी ह्या ध्येयानें विश्राम मंडळांतील बऱ्याच सभासदांनीं हें कार्य धडाडीनें हातीं घेतलें आहे. सुशिक्षित तरुणांस तात्त्विक व व्यावहारिक व्यापार व उद्योग-धंद्याचें शिक्षण मिळून त्यांना स्वावलंबी होण्यास ह्या मंडळाचा पूर्णपणें उपयोग होईल.

## एव्हर सिल्व्हर

वापरून

**कल्हईचा खर्च वाचवा.**

या धातूचीं भांडीं कळकत नाहींत व त्यांना सहज पोचे येत नाहींत आणि तीं दिसण्यांत फारच सुबक असतात.

सोलापुरांत मिळण्याचें ठिकाणः—
**दि टिकेकर टेक्स्टाईल मिलसचें दुकान.**
कसबा पेठ, मेन रोड, सोलापूर.

**ओगले ग्लास वर्क्स लि०**
पो. ओगलेवाडी,
सं. औंध. जि. सातारा.

# विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ३ आ. ९ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. ३ आ. ९ पै इतका पडला.

### बेळगांव येथील शेतकी प्रदर्शन

बेळगांव येथील कर्नाटक शेतकी प्रदर्शनाचें उद्घाटन ता. १७ जानेवारी रोजीं मुंबई इलाखाधिपतींचे हस्तें होणार आहे.

### अमेरिकन सरकारचें अंदाजपत्रक

अमेरिकेचें येत्या वर्षाचें बजेट मि. रूझवेल्ट ह्यांनीं कायदे-मंडळास सादर केलें, त्यावरून अमेरिकेस ३० जून, १९३९ अखेर संपणाऱ्या वर्षी १६ अब्ज रु. उत्पन्न होऊन सुमारें २३ अब्ज रु. तूट येईल, असा अंदाज आहे. म्हणजे, गेल्या वर्षापेक्षा तूट ४० कोटींनीं कमी येईल अशी अपेक्षा आहे. राष्ट्रीय कर्जाचा आकडा शंभर अब्जांवर जाईल, असें दिसतें.

### ब्रह्मपुत्रानदीवर पूल

ब्रह्मपुत्रानदीवर गोहतीजवळ अमिनगांव येथें एक ३ हजार फूट लांबीचा पूल बांधून ईस्टन बेंगाल रेल्वे व आसाम बेंगाल रेल्वे ह्यांचे फाटे जोडण्याची योजना घाटत आहे. ह्या रेल्वे पुलावरून जोडूनच रस्त्याचीहि तरतूद असावी अशी आसाम सरकाची सूचना आहे, ती मान्य झाल्यास पुलाच्या खर्चाचा कांहीं भाग त्या प्रांतास सोसावा लागेल.

### मुंबई बंदरांतून युरोपकडे रवाना झालेले उतारू

ऑक्टोबर, १९३७ अखेर संपलेल्या वर्षांत मुंबई बंदरांतून २० हजार उतारू युरोपकडे रवाना झाले. त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा हा आकडा १½ हजारांनीं मोठा आहे.

### संप व त्यामुळें बुडालेले कामाचे दिवस

जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर, १९३७ ह्या तिमाहींत हिंदुस्थानांतील सर्व कारखान्यांत मिळून कारखानदार व कामगार ह्यांमध्यें ८० वांधे उपस्थित झाले व त्यांमुळें १ लक्ष, २१ हजार कामगारांचे एकंदर १०⅓ लक्ष इतके कामाचे तास बुडाले. ह्यांमध्यें मुंबई इलाख्यांतील कपास कापडाच्या गिरण्यांतील १४½ हजार कामगारांच्या बुडालेल्या ८३ हजार कामाच्या दिवसांचा अंतर्भाव होतो.

### उतारूंचें भाडें वजनावर आकारतात !

न्यू ग्वायना ह्या ब्रिटिश वसाहतींमध्यें विमानांतून उतारूंची ये-जा चालू आहे. तद्देशीय लोकांची वहातुक करतांना कित्येक प्रसंगीं त्यांच्या वजनदार दराची आकारणी करण्यांत येते. एक पौंड वजनास चार आणे, अशा दरानें मालाप्रमाणें, त्यांचेवर आकारणी होते.

### रिझर्व्ह बँकेची वार्षिक सभा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची तिसरी वार्षिक साधारण सभा सोमवार, ता. ७ फेब्रुवारी, १९३८ रोजीं दिल्ली येथें भरणार आहे.

### औद्योगिक पहाणी

देशांतील वेगवेगळ्या धंद्यांची तपशीलवार पहाणी करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. प्रांतांनीं ह्याबाबत पुढाकार घ्यावा व मध्यवर्ती सरकारनें त्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्याचें काम करावें, अशी हिंदुस्थान सरकारची सूचना आहे. ह्या प्रश्नाचा खल १९३६ सालापासून चालू आहे.

### विजेचें उत्पादन वाढलें

टाटा कंपन्यांच्या खोपोली, भिवपुरी व भिरा येथील वीज-गृहांत १९३७ सालीं एकूण ६६ कोटि, १९ लक्ष युनिट्स वीज निर्माण करण्यांत आली. १९३६ सालीं ५५ कोटि, ८४ लक्ष युनिट्सचें उत्पादन झालें होतें. विजेचें वाढतें उत्पादन हें तिचा उपयोग ज्यास्त प्रमाणावर होत असल्याचें निदर्शक आहे व ज्यास्त स्पष्ट हें औद्योगिक प्रगतीचें लक्षण आहे.

### इजिप्तमधील कपाशीचें उत्पादन

इजिप्तमध्यें दरसाल सुमारें १२ लक्ष गांठी कपास तयार होते, त्यांपैकी शेकडा ९५ कपास परदेशीं निर्गत होते. कपाशीच्या आयातीस त्या देशांत बंदी आहे. १७½ लक्ष एकर इतकें क्षेत्र कपाशीखाली आहे.

### म्हैसूरमध्यें विमा कायदा

हिंदुस्थान सरकारनें योजिलेल्या विमाविषयक कायद्यास अनुसरून म्हैसूर संस्थान स्वतःसाठी कायदा करणार आहे.

### त्रावणकोर स्टेट क्रेडिट बँक

त्रावणकोर संस्थानांतील शेतकऱ्यांचें ऋण विमोचन करणें व उद्योग धंद्यांस सहाय देणें ह्या उद्देशांनीं त्रावणकोर येथें एक मध्यवर्ती बँकेची स्थापना करण्यांत येत आहे. नियोजित बँकेच्या अधिकृत भांडवलापैकीं एक चतुर्थांश, ( म्हणजे २५ लक्ष रु. ) तात्काळ जमविण्यांत येईल.

### अमेरिका–ब्रिटन व्यापारी कराराचीं बोलणीं

अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांमध्यें व्यापारी कराराबाबत वाटाघाटी चालू असून, आतां लवकरच विवक्षित जकातींविषयीं देवाण-घेवाणीच्या बोलण्यांस प्रारंभ होईल. १९३६ सालीं अमेरिकेंतून ४½ कोटि कृत्रिम दातांची ब्रिटनमध्यें आयात झाली. अपेक्षित करारामध्यें ह्या कृत्रिम दातांच्या आयातीस सवलत मिळण्याविषयीं उल्लेख आहे.

### रशियामधील शहरें

रशियांत १९१४ सालीं एकूण १४ कोटि लोकसंख्येपैकीं २३ कोटि शहरवासी होते. गेल्या वर्षाचे अखेर १८ कोटि लोकांमध्यें ४½ कोटि शहरांत रहाणारे होते. त्या देशांत १९१४ सालीं एक लक्ष व अधिक लोकसंख्येचीं १६ शहरें होतीं; १९३३ मध्यें ह्या शहरांची संख्या ६५ इतकी वाढली. मोठ्या प्रमाणांतले धंदे व कारखाने ह्यांच्यामध्यें होणाऱ्या वाढीचा हा परिणाम आहे.

### बंगाल–नागपूर रेल्वे

वरील रेल्वे कंपनीच्या स्थापनेस चालू सालीं ५० वर्षे पुरीं होतील. ह्या रेल्वेच्या मालकीचा रस्ता ३,३०० मैल आहे. कलकत्ता–नागपूर, कलकत्ता–विजगापट्टम, विजगापट्टम–रायपूर, रायपूर–कटणी, हे ह्या रेल्वेचे प्रमुख फाटे आहेत. विजगापट्टम बंदराची आतां झपाट्यानें वाढ होत असल्यानें त्या मार्गानें मध्य व उत्तर हिंदुस्थानाशीं मालाची ने-आण करणें सुलभ झालें आहे. कंपनीची साधारण सभा गेल्या महिन्यांत लंडन येथें भरली होती, त्यावेळीं तिच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत कंपनीच्या उत्कर्षासंबंधीं आशादायक उद्गार काढले. कंपनीला मोटार वहातुक करण्यास परवानगी देणारा एक ठराव विशेष साधारण सभेनें पास केला.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रु. किंमत |
|---|---|
| २६–१२–३७ ते १–१–३८ | १७,९१,२८० |
| २–१–३८ ते ८–१–३८ | ३७,३४,७६३ |
| २१–९–३१ ते ८–१–३८ | ३०८,२२,९१,०८१ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | १४ | ५ जागतिक आणि हिंदी विचार प्रवाह | १९ |
| २ मुंबई सरकारचें शेतकरी वर्गाविषयीं धोरण | १५ | ६ सहकारी चळवळ | १९ |
| ३ ब्लॉसम मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. | १६ | ७ लहान मुलांचीं खेळणीं | २० |
| ४ स्फुट–विचार | १७ | ८ हिंदी साखरेच्या धंद्याची प्रगति | २० |
| हिंदी कामकरी वर्ग व मि. हॅरोल्ड बटलर–उत्तर आयर्लंडचा धडा गिरवा—पॅलेस्टाइनच्या फाळणीचा तपशील ठरविण्यासाठी कमिटी–कपाशीच्या उठावास सहाय–" औद्योगिक मंडळ "–रस्त्यांविषयीं आकडे | | ९ वीज कंपन्यांच्या नफ्यावर नियंत्रण | २० |
| | | १० हिंदी शेतकऱ्यांचें ऋणविमोचन | २१ |
| | | ११ मोटारींचा विमा | २३ |
| | | १२ निवडक बाजारभाव | २३ |



# अर्थ

बुधवार, ता. १२ जानेवारी, १९३८


## मुंबई सरकारचें शेतकरी वर्गाविषयीं धोरण

### श्री. मुरारजी ह्यांचा खुलासा

हिंदुस्थानांतील बहुसंख्य लोकांची उपजीविका शेतीवर चालते व त्यांचें पोट भरण्याचें तें एकमेव साधन आहे. शेतीच्या मालाचे भाव चालू आर्थिक मंदीचे सुरवातीपासून पडून आहेत व त्यामुळें शेतकऱ्यांची स्थिति अत्यंत हलाखीची झाली आहे. शेतीखेरीज उदरनिर्वाहाचें दुसरें कोणतेंच साधन नसल्याकारणानें आहे त्या जमिनींत निघणाऱ्या पिकावर व त्यास येणाऱ्या किंमतीवरच त्यांस गुजराण करावी लागते. वाढत्या लोकसंख्येचे मानानें शेतजमिनीचें क्षेत्रफळ कमी पडूं लागलें आहे व भांडवलाच्या अभावीं ह्या मर्यादित क्षेत्राचाहि पुरेपूर उपयोग करून घेण्यास शेतकरी वर्ग असमर्थ झाला आहे. हिंदुस्थानांतील शेतीचा धंदा किफायतशीर होत नाहीं, असा अनुभव आहे. दरएकरीं उत्पन्न वाढविल्याखेरीज शेतकऱ्यांची हलाखी दूर होणार नाहीं हें उघड आहे; तथापि ही गोष्ट घडून येणें कालावधीचें व बिकट काम आहे. भांडवलाचा अभाव, कर्जाचें दडपण, शेतीच्या साधनांचा तुटवडा, गुरांची घटत असलेली संख्या, अज्ञान, दारिद्र्य, जोडधंद्यांचा अभाव, शेतांच्या क्षेत्रफळाची वांटण्यांमुळें होत असलेली विभागणी इत्यादि कारणांमुळें शेतकऱ्यांचे उन्नतीविषयीं निराशामय वातावरण निर्माण झालें आहे व शेतकरी वर्ग हतबुद्ध, निरुत्साही व दैववादी बनला आहे. ह्या प्रतिकूल परिस्थितींतून त्यास बाहेर काढून त्याची रहाणी सुधारावयाचा प्रयत्न आजपर्यंत नेटानें करण्यांत आलेला नव्हता. कॉंग्रेस प्रधानमंडळांस हा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा वाटत असून त्याबाबत यत्न करण्याचा त्यांनीं चंग बांधला आहे. शेतकऱ्यांची उन्नति म्हणजेच बहुसंख्य लोकांची उन्नति होय, ही खूणगांठ बांधून त्यांनीं त्यांच्या उद्धाराकरितां खटपट चालू केली आहे. शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेस अनेक गोष्टी कारणीभूत आहेत, तेव्हां उपाययोजनाहि बहुविध असल्याविना ती परिणामकारक होणार नाहीं, ह्याची कल्पना सरकारांस आहे.

मुंबई प्रांतिक विधिमंडळाच्या बैठकीस गेल्या सोमवारीं प्रारंभ झाला. तींमध्यें लोकहिताचे दृष्टीनें अनेक महत्त्वाचीं बिलें सरकारतर्फे पुढें आणण्यांत येतील. शेतकऱ्यांच्या कर्जाचा प्रश्न विशेष जिव्हाळ्याचा असल्यानें, त्याबाबत सरकार कोणती योजना आखतें, ह्याकडे जनतेचें लक्ष लागून राहणें सहाजीक आहे. मतदारांस दिलेलीं आश्वासनें कृतींत आणण्याचें जबाबदारीचें काम मंत्रिमंडळावर पडलें असून त्याची जाणीव त्यास आहे, हें त्यानें चालविलेल्या पूर्वतयारीवरून दिसून येतें. अनेक प्रश्नांची चौकशी तें तज्ज्ञांकडून करवीत असून अंगीकृत कार्याचा पाया भरभक्कम व टिकाऊ असावा अशी काळजी घेत आहे.

मुंबई सरकारचे महसूल मंत्री, श्री. मुरारजी देसाई, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबई येथें हिंदी व युरोपियन प्रोग्रेसिव्ह ग्रुप्सच्या सभासदांपुढें एक भाषण केलें, त्यांत त्यांनीं शेतकऱ्यांबाबतचें सरकारी धोरण स्पष्ट केलें. प्रांतिक सरकारांनीं शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कितीहि प्रयत्न केले तरी हिंदुस्थान सरकारकडून त्याबाबत सहकार्य मिळाल्यावांचून ते सफल होणार नाहींत, असें त्यांनीं आपल्या भाषणाच्या प्रारंभींच सांगितलें. जकाती, हुंडणावळ, परराष्ट्रीय व्यापार, इत्यादि खातीं मध्यवर्ती सरकारचे हातीं आहेत व देशी उद्योगधंद्यांचें पोषण व अंतर्गत संपत्तीचें जतन करून राष्ट्रीय संपत्तींत भर पडेल असें धोरण मध्यवर्ती सरकार जोंवर अंगिकारीत नाहीं तोंवर प्रांतिक सरकारांच्या खटपटीस यश येणार नाहीं, हा त्यांचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांना सवलती दिल्यामुळें प्रांतांचें उत्पन्न बुडणार, तें भरून काढण्यास करांच्या इतर बाबी त्यांस उपलब्ध नसतील, तर प्रांतिक सरकारांचे हात जखडले जातील, हें उघड आहे.

खेडेगांवांतील पंचायत पद्धतीचा आतां अवशेषहि राहिला नसून त्याबरोबर सहकार्यानें काम करण्याची संवयहि नष्ट झाली आहे. एकंदर सर्व घडीच विस्कटली असून भांडण-तंट्यांचा सुकाळ झाला आहे. कर्जाचे डोंगराखाली शेतकरी वर्ग गुदमरून गेला आहे. अशा परिस्थितींत शेतकऱ्यांची स्थिति सुधारावयाची म्हणजे त्यांचें कर्ज वाढूं नये अशी तजवीज केली पाहिजे, आहे त्या कर्जाचा भार कमी केला पाहिजे व त्यांची आर्थिक उन्नति होईल अशी विधायक योजना हातीं घेतली पाहिजे. मध्यप्रांतांतील कर्ज-तडजोड बोर्डाच्या धर्तीवर मुंबई इलाख्यांतहि बोर्डें नेमण्याचा सरकारचा मानस असल्याचें श्री. मुरारजी ह्यांनीं आपल्या भाषणांत जाहीर केलें. कर्जतहकुबीचा प्रश्न अव्यवहार्य म्हणून अद्याप बाजूस ठेवलेला नाहीं; त्याबाबत सरकारचा विचार चालू आहे, असें ते म्हणाले. सहकारी चळवळीमध्यें इष्ट ती सुधारणा करून व ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन करून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति सुधारतां येईल, अशी त्यांची अपेक्षा आहे. जमीन महसुलाबाबतचा कायदा (लँड रेव्हेन्यू कोड) ६० वर्षांपूर्वीं करण्यांत आला, त्यानंतर त्यांत किती तरी दुरुस्त्या व फेरफार झाले आहेत. सारावाढ कोणत्या तत्त्वावर व्हावी ह्यासंबंधींहि आजवर कित्येक मतभेद उपस्थित झाले आहेत. वर नमूद केलेल्या अनेक प्रश्नांचा विचार करून इष्ट ती सुधारणा घडवून आणावी लागेल, असें त्यांनीं सांगितलें. व शेतीचा धंदा कसा किफायतशीर होईल, ह्याकडेहि सरकार लक्ष पुरवील, असें त्यांनीं आश्वासन दिलें. "शैक्षणिक, पाणी पुरवठ्या-

बाबत व शेतीविषयक योजना अमलांत आल्या व कर्जनिवारणाची मोहीम यशस्वी होऊन धारा पद्धतींत इष्ट तीं सुधारणा झाली म्हणजे शेतकरी प्रगतीचे मार्गावर आल्यासारखें होईल" ह्या त्यांच्या उद्गारावरून शेतकऱ्यांच्या उन्नतीचा प्रश्न किती व्यापक आहे व तो सोडविण्यास किती नेटानें व धिमेपणानें प्रयत्न केले पाहिजेत, ह्याची कल्पना येईल. श्री. मुरारजी ह्यांच्या भाषणावरून सरकार या बाबतींत काळजीपूर्वक लक्ष घालीत आहे, हें दिसून येते. समाजाच्या एका वर्गाचा उद्धार करतेवेळीं, दुसऱ्या वर्गास थोडाफार स्वार्थत्याग करावा लागेल व झीज सोसावी लागेल, हें उघड आहे. ह्या गोष्टीचा श्री. मुरारजी ह्यांनीं उल्लेख केला नसला तरी शेतकऱ्यांच्या रहाणींत सुधारणा घडवून आणण्यास पडणाऱ्या खर्चाचा बोजा इतर वर्गांस सोसावा लागेल व तो त्यांनीं अंतिम सामाजिक हिताच्या दृष्टीनें सोसावा, त्यांत राष्ट्राचें व त्याबरोबर त्यांचें स्वतःचेंच हित आहे, ही कल्पना त्यांच्या योजनांच्या मुळाशीं असली पाहिजे.

## कपाशीचें फाजील उत्पादन

जागतिक आर्थिक मंदीमुळें कपाशीचा खप अपेक्षेप्रमाणें कमी न होतां, गेल्या आठ वर्षांत तो वाढलेलाच असल्याचें दिसून येतें. रेयॉन कापडाची कपास-कापडाशी तीव्र स्पर्धा चालू आहे; तरी पण कपाशीचा उठाव चांगल्या तऱ्हेनें होत आहे. १९२९-३० सालांतील कपाशीच्या खपाचे मानानें १९३६-३७ सालीं १९ टक्के खप ज्यास्त झाला. ह्यावरून असें अनुमान निघतें, कीं हल्लीं कपाशीचा भाव पडला आहे, त्याचें कारण गिऱ्हाइक कमी झालें आहे हें नसून उत्पादन फाजील झालें आहे, हें होय. खालील कोष्टकांत, जगांतील प्रमुख देशांतील गिरण्यांत उठाव झालेल्या कपाशीचे तुलनात्मक आकडे दिले आहेत.

कपाशीचा उठाव
( कोटि पौंड )

| | १९२९-३० | १९३०-३१ | १९३३-३४ | १९३४-३५ | १९३६-३७ |
|---|---|---|---|---|---|
| अमेरिका | २,९२ | २,५२ | २,७३ | २.५६ | ३,८० |
| जपान | १,३० | १,११ | १,४७ | १,६६ | १,७७ |
| ग्रेटब्रिटन | १,२३ | ९७ | १,२४ | १,२४ | १,४१ |
| चीन | १,११ | १,१२ | १,१९ | १,२४ | १,२३ |
| हिंदुस्थान | ९८ | १,०३ | १,०३ | १,२१ | १,२२ |
| रशिया | ९१ | ८३ | ८५ | ९० | ९९ |
| फ्रान्स | ५७ | ५४ | ५६ | ४९ | ६० |
| जर्मनी | ६३ | ५२ | ७४ | ४५ | ५४ |
| इटली | ४१ | ३७ | ४७ | ३८ | ० |
| जगांत एकूण | ११,७३ | १०,४३ | ११,८२ | ११,८९ | १३,९४ |

जपान, चीन, हिंदुस्थान, ब्रॅझील, कॅनडा इत्यादि देशांत आतां कपास कापडाच्या गिरण्यांची संख्या वाढली आहे व कपाशीचा उठावहि वाढत्या प्रमाणांत होत आहे. कपाशीचें दर-एकरी उत्पादन गेल्या एक-दोन वर्षांत बरेंच सुधारलें असल्यानें लागवडीच्या क्षेत्रांत भर पडली नाहीं तरी कपाशीचें उत्पादन भरमसाट वाढलें आहे. अमेरिकेनें आपलें कपाशीचें उत्पादन नियंत्रित करून बाजारभाव सावरण्याचा यत्न केला, परंतु तो फसला व कपाशीच्या बाजारांत त्यामुळें अमेरिकेचें महत्त्व थोडें कमी झालें. १९३४-३५ मधील जागतिक उत्पादनापैकी शेकडा ५५ इतकें उत्पादन अमेरिकेमध्यें झालें; १९३६-३७ सालीं अमेरिकेचा हिस्सा ४० टक्क्यांवर आला. कपाशीचें जागतिक उत्पादन चालू वर्षी सुमारें ५ कोटि गाठी होईल व त्यांपैकीं ३ कोटि गाठी खपून २ कोटि शिल्लक रहातील असा अजमास आहे. प्रत्येक देशानें आपली कपास जाळून टाकल्याखेरीज किंवा कोठ्यवधि लोकांनीं कपडे ज्यास्त विकत घेतल्याखेरीज कपाशीचा भाव चढणें शक्य नाहीं, असें 'एकॉनॉमिस्ट' पत्रानें स्पष्ट लिहिलें आहे.

कपाशीच्या बाजारभावाचा प्रश्न जागतिक स्वरूपाचा आहे व त्याबाबतची उपाययोजनाहि तितक्याच व्यापक प्रमाणावर आखण्यांत आली पाहिजे, हें वरील विवेचनावरून दिसून येईल. कपाशीच्या उत्पादनांत हिंदुस्थानाचा दुसरा नंबर लागतो. तथापि, अमेरिका, चीन, रशिया व ब्राझील ह्या देशांतहि लागवड प्रचंड प्रमाणावर होते. हिंदी कपाशीपैकी शेकडा ४० इतकी कपास निर्गत होते, ह्या कारणानें तिला जागतिक बाजारभाव प्राप्त होतो. कपास लावणाऱ्या शेतकऱ्याचा उत्पादन खर्च हा त्यास मिळणाऱ्या बाजारभावावर अवलंबून नसल्यानें त्याची मोठी कुचंबणा होते व त्याची दुःस्थिति व असहायता ह्यांस मर्यादा रहात नाहीं. अशा प्रसंगीं सरकारनें जागरुकपणें त्याच्या मदतीस धांवल्याखेरीज त्याचें तारण होणें शक्य नाहीं. सरकारास ह्या बाबतींत काय करतां येईल, ह्याचें विवेचन 'अर्था' मध्यें येत आहे. ऑ. इं. काँ. कमिटीनें ह्या प्रश्नाचा विचार करून सुचविलेल्या उपाय योजनेचा सारांश आजच्या अंकांत दुसरीकडे आला आहेच. आतां तातडीनें योजना आखून शेतकऱ्यांस संकटमुक्त करण्याची आवश्यकता आहे व तें काम सरकारनें सत्वर हातीं घेणें इष्ट आहे. खासगी प्रयत्नांनीं होणारी ही गोष्ट नाहीं हें उघड आहे. सरकारनें आपली जबाबदारी टाळतां कामा नये, कारण शेतकऱ्यांस दुसरा त्राता कोणी नाहीं.

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

जाहीर खुलासा

हिंदुस्थानांतील प्रमुख कंपन्यांच्या "इंडियन लाईफ ऑफिसेस असोसिएशन" चे वार्षिक सभेंत असोसिएशनचे सभासद कंपन्यांनीं कॅलेंडर्स वगैरे छापून वाटूं नयेत असा ठराव पास करण्यांत आला आहे. "कॉमनवेल्थ" विमा कंपनी या संस्थेची सभासद असल्याकारणानें नूतन वर्षानिमित्त आमचे विमेदार, एजंट व डॉक्टर्स यांस भेटीदाखल देण्यांत येणारीं कॅलेंडर्स यंदा काढलेलीं नाहींत. तरी याबाबत विमेदार, डॉक्टर्स व एजंट यांनीं गैरसमज करून घेऊं नये अशी विनंती आहे.

मॅनेजिंग एजन्टस,
कॉमनवेल्थ विमा कं. लि., पुणें.

# स्फुट विचार

## हिंदी कामकरी वर्ग व मि. हॅरोल्ड बटलर

हिंदुस्थानांतील कामकरी वर्गाची स्थिति अवलोकन करण्याच्या हेतूनें आंतर राष्ट्रीय मजूर संस्थेचे संचालक, मि. हॅरोल्ड बटलर या देशांत आले होते, ते आपला दौरा संपवून गेल्या आठवड्यांत परत गेले. महायुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा विचार करण्याकरितां राष्ट्र संघ स्थापन झाला. सामान्य जनता व कामकरी वर्ग ह्यांच्या हिताच्या जोपासनेसाठीं आंतर राष्ट्रीय मजूर संस्था स्थापन करण्यांत आली. ह्या संस्थेच्या विद्यमानें कारखानदार, कामकरी व सरकार यांचे प्रतिनिधी जिनिव्हा येथें एकत्र जमून मजुरांच्या स्थितीची सुधारणा व्हावी ह्या उद्देशानें निरनिराळ्या प्रश्नांची चर्चा करतात आणि प्रगतीबाबतच्या योजना सुचवतात. मि. बटलर ह्यांनीं हिंदुस्थानांत सर्वत्र हिंडून स्वतःच्या डोळ्यांनीं येथील कारखान्यांची स्थिति पाहिली आणि त्यांचे विचार समजून घेतले. आपल्या दौऱ्याचे स्वतःच्या मनावर काय परिणाम झाले, हें वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींस दिलेल्या मुलाखतींत सांगतांना त्यांनीं अत्यंत सावध रीतीनें विचार प्रगट करणें स्वाभाविक होतें. कारखानदार किंवा कामकरी ह्यांस दोष न देतां हिंदुस्थानांतील परिस्थिति आज कोणत्या प्रकारची आहे आणि ती कोणत्या मार्गांनीं सुधारली पाहिजे, ह्याविषयींच्या आपल्या कल्पना त्यांनीं समतोल वृत्तीनें पुढें मांडल्या आहेत. कारखानदार व कामकरी ह्यांचे परस्पर संबंध स्नेहाचे असावे आणि मजुरांच्या राहणींत सुधारणा व्हावी ह्या दोन गोष्टी साध्य करावयाच्या आहेत असें सांगून आपल्या कामकऱ्यांच्या हिताकडे लक्ष पुरवणाऱ्या कारखानदारांचा कित्ता सर्वांनीं गिरवल्यास दोन पक्षांत उडणारे तंटे कमी होतील असें मि. बटलर ह्यांनीं सांगितलें. खेडेगांवांतले बेकार लोक शहरांत गिरण्यांतल्या कामावर जातात आणि हलक्या मजुरीवर संतुष्ट राहाणें त्यांस भाग पडतें. शेतीचा धंदा सुधारून शेतकऱ्यांची स्थिति चांगली झाल्याशिवाय कारखान्यांतील मजुरांच्या राहणींत प्रगति होणें कठीण जाईल हा त्यांचा अभिप्राय लक्षांत ठेवण्यासारखा आहे. त्यांच्या विचारांत, एकंदरीनें पहातां, बरेंच आशावादित्व दिसून आलें.

---

## उत्तर-आयर्लंडचा धडा गिरवा

उत्तर-आयर्लंड स्वतंत्र दक्षिण आयर्लंडप्रमाणें राजकीयदृष्ट्या स्वतंत्र न होतां ग्रेटब्रिटनला चिकटून राहिलें आहे. पण तेथील सरकार ग्रेटब्रिटनचा एक भाग ह्या नात्यानें त्या देशाशीं मोकळेपणानें व्यापार होण्यास मुभा देत असलें तरी त्यानें स्वदेशी उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्यास मागेंपुढें पाहिलेलें नाहीं. शेतीच्या मालाचें उत्पादन, लिनन जातीचें कापड तयार करणें आणि आगबोटींची बनावट हे उत्तर आयर्लंडचे प्रमुख धंदे आहेत. त्याबरोबरच, अनेक छोटेखानी धंदे त्या देशांत चालतात. त्यांच्या उत्कर्षाकडे लक्ष देणें हें तेथील सरकार आपलें कर्तव्य समजतें. तथापि, जुन्या पायावर औद्योगिक इमारत उभारण्यास सहाय देऊनच तें सरकार स्वस्थ बसत नाहीं. आपल्या देशांत नवीन धंदे प्रस्थापित व्हावे ह्यासाठीं त्याचा प्रयत्न सारखा चालू असतो. ह्या दिशेनें प्रगति व्हावी म्हणून १९३२ सालीं एक कायदा करण्यांत आला. त्याच्या उत्तेजनानें विमानें बनवण्याचा धंदा निघाला आणि ह्या अनुभवाचा फायदा घेतला जाऊन गेल्या वर्षीं सदरहु कायद्याची व्याप्ति वाढवण्यांत आली. ज्यांचे योगानें लोकांस रोजगार मिळेल असा नवा धंदा पांच वर्षांच्या अवधींत स्थापन करणारास सरकारकडून द्रव्याचें सहाय मिळण्याची व्यवस्था ह्या कायद्यानें झालेली आहे. कारखान्यांस लागणाऱ्या इमारतींच्या भाड्याचा खर्च सरकार सोसतें. नवीन इमारती बांधल्या गेल्यास त्यांसाठीं बिनव्याजी कर्जाऊ रकमहि तें देतें. ह्या कारखान्यांस स्थानिक करांची माफी मिळते. कांहीं द्रव्यसहाय ग्रँटच्या स्वरूपांत असतें आणि कर्जाची रकम कारखानदारांकडून सवलतीनें परत घेण्यांत येते. नवीन उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्याची ही योजना फलद्रूप होईल असा विश्वास आपणांस वाटत असल्याचें उत्तर आयर्लंडच्या व्यापार मंत्र्यांनीं बोलून दाखविलें आहे. परदेशांत राज्यकर्ते स्वदेशी उद्योगधंद्यांची जोपासना कशी करतात आणि त्यांस द्रव्यसहाय देऊन त्यांचा उत्कर्ष कसा घडवून आणतात ह्याचें प्रस्तुतचें उदाहरण हिंदुस्थानांत सर्वस्वी अनुकरणीय आहे!

---

## पॅलेस्टाइनची फाळणी—तपशील ठरविण्यासाठीं कमिटी

पॅलेस्टाइनमध्यें ज्यू लोकांस अवसर मिळेल असें त्यांस राष्ट्रसंघानें अभिवचन दिलेलें होतें त्यास अनुसरून तेथील ज्यू वस्ती झपाट्यानें वाढत होती व त्यांच्या प्रयत्नानें पॅलेस्टाइनची प्रगतिहि पुष्कळ झाली होती. स्थानिक अरबांस ही गोष्ट न पटल्यानें, ज्यू लोकांचें तेथून उच्चाटन व्हावें अशी त्यांची मागणी होती. ह्या असमाधानाचें पर्यवसान बंडाळींत झालें. तेथील परिस्थितीची चौकशी करून सूचना करण्याकरितां ब्रिटिश सरकारनें लॉर्ड पील ह्यांचे अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमलें. पॅलेस्टाइनची व्यवस्था पहाण्याचें काम महायुद्धानंतर ग्रेटब्रिटनकडे आलेलें होतें हें त्याचें कारण होय. कमिशननें एकंदर परिस्थितीचा विचार करून पॅलेस्टाइन मँडेटची फाळणी करावी व ज्यू आणि अरब अशीं दोन स्वतंत्र राष्ट्रें निर्माण करून त्यांत मुलूख वाटून द्यावा असें सुचविलें. तेथील पवित्र स्थळांच्या संरक्षणार्थ एक मँडेट असावें अशीहि कमिशननें शिफारस केली. ज्यू व अरब ह्या दोघांसहि ही योजना अमान्य आहे. पॅलेस्टाइनचें लष्करी केंद्र ह्या दृष्टीनें विशेष महत्त्व आहे व त्यासाठीं ब्रिटिश सरकार ह्या प्रश्नांत बारकाईनें लक्ष घालीत आहे. फाळणीची योजना पील कमिशननें सुचविली, परंतु त्याबाबत तपशीलवार सूचना त्यांनीं केल्या नाहींत. हें काम ब्रिटिश सरकारनें आतां एका नवीन कमिशनकडे सोपविलें आहे. कमिशनच्या रिपोर्टाचा विचार करून सरकारास फाळणीची योजना ग्राह्य वाटली तर राष्ट्रसंघाकडून ह्या प्रश्नाबाबत अखेरचा निर्णय मागण्यांत येईल.

---

## कपाशीच्या उठावास सहाय—आयातीवर नियंत्रण

कपाशीच्या पडलेल्या भावामुळें शेतकऱ्यांस प्राप्त झालेल्या दुःस्थितींतून त्यांची सुटका व्हावी म्हणून उपाययोजना सुचविण्यासाठीं ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें श्री. भुलाभाई देसाई, श्री. जमनालाल बजाज व श्री. शंकरलाल बँकर ह्यांची एक समिति नेमली होती. तिनें आपला रिपोर्ट सादर केला आहे. येत्या मोसमांत कपाशीची लागवड कमी होईल अशी खटपट प्रांतिक सरकारांनीं करावी, कपाशीच्या साठवणीचे तारणा-

वर शेतकऱ्यांस कर्ज द्यावें, कपाशीचा उठाव परदेशांत सुलभतेनें व्हावा ह्याकरितां निर्गत होणारा माल अंतर्गत भावापेक्षां स्वस्त विकण्यांत यावा व किंमतीमधील तफावत सरकारनें सोसावी, एक इंच व त्यापेक्षा कमी लांब धाग्याच्या कपाशीच्या आयातीस बंदी करण्यांत यावी, तेजीमंदीच्या व्यवहारावर कडक नियंत्रण ठेवण्यांत यावें, इत्यादि सूचना कमिटीनें केल्या आहेत. मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांच्या सहकार्यावरच त्यांची अंमलबजावणी अवलंबून राहील हें उघड आहे. प्रांतिक सरकारांनीं ह्याबाबत हिंदुस्थान सरकारकडे धरणें धरून बसावें, असा कमिटीचा आग्रह आहे. कॉंग्रेस प्रधान मंडळांस ही सूचना पटून तिचा मध्यवर्ती सरकारावर काय परिणाम होतो, हें पहावें. अखिल भारतीय स्वरुपाचा हा प्रश्न असल्यानें, तो सोडविण्याचें साधनहि मध्यवर्ती सरकारचेच हातीं आहे व त्याबाबत पुढाकारहि त्यानेंच घेणें आवश्यक आहे.

### " औद्योगिक मंडळ "

आजच्या अंकाच्या मुखपृष्ठावर " औद्योगिक मंडळा "ची जाहिरात छापली आहे, ती आर्थिक प्रगतीविषयीं महाराष्ट्रांत होत चाललेल्या जागृतीची स्पष्ट निदर्शक आहे. उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांच्या उत्कर्षावांचून महाराष्ट्रीय तरुण पिढीस तरणोपाय नाहीं, ह्या विचारानें तळमळणाऱ्या सेवानिवृत्त व सुस्थितींतल्या कांहीं गृहस्थांनीं व्यापाराच्या क्षेत्रांत पाऊल टाकलें आहे आणि क्रमाक्रमानें आपल्या आर्थिक कार्याचा व्याप वाढवण्याची त्यांची मनीषा आहे. सुशिक्षित वर्गास पोटापाण्याच्या साधनांचा मार्ग मोकळा करून यावयाचा ह्या उद्देशानें मंडळानें व्यापारव्यवसायाचें उदाहरण स्वतः घालून देऊन त्याचा पुढें विस्तार करण्याची योजना आखली आहे. अनुभव येईल त्याप्रमाणें उद्योगधंद्यांच्या आपल्या मर्यादा वाढवावयाच्या ही त्याची योजना व्यावहारिकपणा व सावधगिरी ह्यांचे दृष्टीनें योग्य आहे. तरुणांस व्यावसायिक शिक्षणाची सोय व स्वतंत्र धंदे काढून चालविण्याची संधि उपलब्ध करून देण्याची मंडळाची मनीषा स्तुत्य आहे आणि ती पुरी होण्यास आवश्यक असलेलें जनतेचें सहाय त्यास मिळणें अगत्याचें आहे. सेवानिवृत्त, वृद्ध मंडळी तरुणांस साजेल ह्या उत्साहानें धंद्यांस प्रवृत्त झाली हें अर्थपूर्ण सुचिन्ह आहे.

### ब्रिटिश रस्त्यांविषयी आकडे

ग्रेटब्रिटनमधील हमरस्त्यांची लांबी १,७८,९०४ मैल असून २७,५०,००० वहानें त्यांवरून वावरतात. पहिल्या व दुसऱ्या प्रतींच्या मोठ्या रस्त्यांची एकूण लांबी ४४,००० मैल आहे आणि शहरांतले रस्ते ३३,७०० मैल लांबीचे आहेत. वहातुकीचे बाबतींत दर मैलास ३६ गाड्या असें प्रमाण बसतें. रस्त्यांच्या कोठल्याहि ठिकाणीं दर चार सेकंदांस एक गाडी सरासरीनें चाललेली आढळते. वहानांवरील कराचें वार्षिक उत्पन्न सुमारें ४३ कोटि रुपये भरतें. रस्त्यांच्या सुधारणेप्रीत्यर्थ पांच वर्षांत १३० कोटि रुपये खर्चण्याची योजना निश्चित झालेली आहे.

### ग्वालेर येथें सहकारी परिषद्

प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या रिपोर्टाबाबत सरकारी धोरण जाहीर करण्याकरितां ग्वालेर येथें ता. १५ व ता. १६ जानेवारी रोजीं एक सहकारी परिषद् बोलावण्यांत आली आहे. हिज हायनेस महाराजासाहेब हे परिषदेचें उद्घाटन करणार असून प्रो. काळे हे अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत.


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,०५,५०,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.



## औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आटपाडी, कुंडल, गुणदाळ, बिचूद स्टेशन व दिघंची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.



## न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतोः—

(१) कंपनीचें स्थैर्य. ( २ ) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

" न्यू इंडिया " ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

## जागतिक आणि हिंदी विचारप्रवाह

### मि. मार्टिन ह्यांची पृच्छा व प्रो. काळे ह्यांचें उत्तर

जिनीव्हा येथील आंतरराष्ट्रीय कामकरी कचेरीचे अधिकारी, मि. मार्टिन, पूर्व एशियांतील देशांमध्यें हिंडून आतां हिंदुस्थानांतल्या आर्थिक परिस्थितीचें अवलोकन करण्यासाठीं या देशांत आले आहेत. पुण्याचे मुक्कामीं गेल्या आठवड्यांत गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अँन्ड एकॉनॉमिक्सचे डायरेक्टर, प्रि. धनंजयराव गाडगीळ, ह्यांनीं स्थानिक धंद्यांतील कामकऱ्यांची स्थिति पहाण्याची संधि त्यांस दिली आणि कांहीं प्रमुख मंडळींच्या समवेत त्यांच्याशीं विचारविनिमय केला. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या विद्यमानें श्री. कोदंडराव ह्यांनींहि मि. मार्टिन ह्यांचे विचार ऐकण्यासाठीं कित्येक मित्रांस निमंत्रण दिलें होतें. त्या प्रसंगीं अनौपचारिक स्वरूपाची चर्चा झाली. आज जगांत परस्पर विरुद्ध असे विचारांचे प्रवाह वहात असून हुकुमशाही व लोकशाही, स्वराष्ट्रीयत्व व आंतरराष्ट्रीयत्व व्यक्तिस्वातंत्र्य व पक्षनिष्ठा अशा प्रकारचें द्वंद्व चोहोंकडे उपस्थित झालेलें आहे. त्यासंबंधांत निरनिराळ्या राष्ट्रांतल्या परिस्थितीचें दिग्दर्शन करून हिंदुस्थानांत वरील विचारांपैकीं कोणते प्रभावी होत आहेत हें जाणण्याची इच्छा मि. मार्टिन यांनीं प्रकट केली. हिंदुस्थानच्या लोकांमध्यें व्यक्तिस्वातंत्र्य, आंतरराष्ट्रीयत्व व लोकशाही ह्यांसंबंधीं आस्था आहे कीं नाहीं ह्या विषयींची त्यांस जिज्ञासा होती. त्यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नांस कांहीं वक्त्यांनीं उत्तरें देण्याचा प्रयत्न केला. मि. मार्टिन हे आपल्या दौऱ्यांत भिन्न भिन्न पक्षांच्या पुढाऱ्यांस भेटत आहेत. स्थानिक मतासंबंधानें त्यांची भलतीच कल्पना होऊं नये अशा बेतानें प्रस्तुत खासगी चर्चेंत अभिप्राय व्यक्त करण्यांत येत होते. प्रो. काळे ह्यांच्या भाषणाचा गोषवारा येणें प्रमाणें:—हिंदी लोकमताची प्रवृत्ति हुकूमशाहीकडे वळत आहे असें म्हणणें खरें नाहीं. लोकशाहीची प्रगति येथें झपाट्यानें होत असल्याचें दिसून येईल. इंग्लंडमध्यें ग्लॅडस्टन किंवा चेंबर्लेन ह्यांच्या मतांची छाप लोकांच्या मनावर बसली होती तसाच प्रकार कांहीं पुढाऱ्यांबाबत ह्या देशांत होणें अपरिहार्य आहे. पक्षाच्या घटनेबाबत व कडक शिस्तीसंबंधानें असेंच म्हणतां येईल. योजनात्मक आर्थिक उन्नति एकराष्ट्रीयत्वाच्या पायावर व्हावी अशी हिंदी जनतेची इच्छा असणें अगदीं स्वभाविक आहे. अंतरराष्ट्रीयत्वाची भावना इंग्लंडमध्यें विशेष जागृत असेल तर तिला कारण ब्रिटिशांचें राष्ट्रीयत्वच होय. ब्रिटिश उद्योगधंदे व व्यापार ह्यांस आंतरराष्ट्रीय व्यापाराचा उत्कर्ष पोषक आहे. ब्रिटिश सरकारहि राष्ट्रीयत्वमूलक धोरण आज अमलांत आणीतच आहे कीं नाहीं? प्राचीन काळापासून व्यापारी व धंदेवाले ह्यांचे संघ ह्यांस राजांनीं व्यवहार-स्वातंत्र्य दिलें असून हिंदी ग्रामसंस्था व पंचायती लोकशाहीच्या निदर्शक आहेत. जनतेचा अभ्युदय हें ध्येय राष्ट्रीय सभेनें आपल्या पुढें ठेवलें असून शेतकरीवर्गाच्या उन्नतीचे प्रयत्न प्रांतिक सरकारें करीत आहेत, ह्यावरून हिंदी राजकारणाचें उद्दिष्ट ब्रिटिश उद्दिष्टाहून भिन्न नाहीं हें दिसून येईल. विचाराचे प्रवाह ह्या देशांत कसे वहात आहेत ह्याची स्थूल मानाची कल्पना ह्यावरून येईल. ह्या बाबतींत पूर्ण ऐकमत्याची अपेक्षा करतां येणार नाहीं, पण सर्वसाधारण दिशा निर्दिष्ट करतां येणें शक्य आहे.

### खानदेश सहकारी वृत्त

धी मुंबई प्रॉ. को. बँक शाखा नंदुरबार व तळोदे यांची वार्षिक साधारण सभा ता. २१-१२-३७ रोजीं झाली. सभेचें अध्यक्षस्थान नंदुरबार येथील स्थानिक वकील श्री. टिकमभाई सराफ यांनीं स्वीकारलें होतें. सामील झालेल्या सोसायट्यांचे प्रतिनिधि व इतर अनेक सभ्य मंडळी सदर सभेस हजर होती. सहकारी तत्त्वावर सामुदायिक पद्धतीनें उत्तम शेती करणें, खरेदी-विक्रीच्या सोसायटीचा फायदा घेणें इत्यादि मार्गांनीं शेतकरी बांधवांची उन्नति कशी घडून येईल ह्याबद्दल श्री बांबरे यांनीं भाषण केलें. त्यानंतर श्री. कोतवाल यांनीं भिल्ल बांधवांची सुधारणा कशी होईल व ते सोसायटीशीं चिकटून राहिल्यास त्यांचा फायदा कसा होईल याचा मार्मिक शब्दांत उपदेश केला. सोसायट्यांच्या व्यवहारांत येणाऱ्या अडचणींबद्दलचे एकदोन ठराव श्री. बारी यांनीं आणले व त्यांचें स्पष्टीकरण श्री. उपाचार्य यांनीं केलें.

अध्यक्षांनीं शेतकरी बंधूंचे दृष्टीनें लग्नकार्यांत खर्च कमी करणें, तंटेबखेडे आपसांत मिटविणें, सहकारी चळवळीचें महत्व व त्यापासून शेतकरी बांधवांची उन्नति इत्यादिबद्दल परिणामकारक असें भाषण केलें.

---

### 'सह्याद्रि'—समाजवाद विशेषांक

'सह्याद्रि' मासिकानें समाजवाद विशेषांक काढून चवथ्या वर्षांत पदार्पण केलें आहे. हिंदुस्थानाच्या सद्यःस्थितींत समाजवाद विरुद्ध राष्ट्रवाद असा लढा उपस्थित होणें इष्ट नसलें तरी राष्ट्रीय स्वातंत्र्याबरोबर आर्थिक समताहि प्राप्त होणें आवश्यक आहे, अशा तऱ्हेच्या मताचा पगडा लोकांवर बसूं लागला आहे, हें उघड आहे. ह्या दोहोंपैकीं प्राधान्य कशास द्यावें व कोणत्या ध्येयाच्या प्राप्तीमुळें दुसऱ्या ध्येयाची प्राप्ती सुकर होईल, हा मतभेदाचा प्रश्न आहे. समाजवादी लोकांतहि एकवाक्यता असणें अशक्य आहे.. जनतेमध्यें ह्या प्रश्नाविषयीं कुतूहल निर्माण झालेलें असून काँग्रेसनें अधिकार स्वीकार केल्यापासून समाजवाद हा विषय केवळ तात्त्विक महत्त्वाचा राहिलेला नाहीं. "सह्याद्री"नें आपल्या विशेषांकांत ह्या प्रश्नावर अनेक अधिकारी लेखकांचे व कार्यकर्त्यांचे लेख प्रसिद्ध केले आहेत व त्यामुळें वाचकांस ह्या महत्त्वाच्या प्रश्नाचें परिशीलन करणें शक्य झालें आहे. समाजवादास घाबरून जाणारे आतां कोणी उरले नाहींत; प्रत्यक्ष व्यवहार व तत्त्व ह्यांचा मेळ विशिष्ट परिस्थितींत कसा बसवावयाचा हा प्रश्न मात्र अत्यंत महत्त्वाचा आहे. "सह्याद्री"नें आपल्या प्रस्तुत विशेषांकाचे द्वारां आपल्या वाचकांस साधकबाधक विचार करावयास लावणारें वाङ्मय उपलब्ध करून दिलें आहे.

---


**व्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत**

डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

## लहान मुलांचीं खेळणीं

लहान मुलांच्या करमणुकीखातर त्यांस खेळणीं देण्यांत येतात. करमणुकीबरोबरच त्यांची जिज्ञासा वाढून ज्ञानवृद्धिहि व्हावी, अशीं शैक्षणिक खेळणीं आतां बाजारांत ज्यास्त ज्यास्त येऊं लागलीं आहेत. ग्रेट ब्रिटन, अमेरिका, इत्यादि देशांत नाताळचे सणानिमित्त खेळण्यांचा प्रचंड खप होतो. सबंद वर्षांतील खपाचे मानानें एकट्या डिसेंबरांतच शेकडा ५० चे वर खेळणीं खपतात, असा अनुभव आहे. गेल्या नाताळांत अमेरिकेंत एकूण सुमारें ५० कोटि रुपयांचीं खेळणीं खपलीं. डिसेंबरांत विकल्या जाणाऱ्या मालाची खरेदी आधीच्या एप्रिलमध्येंच करण्यांत येते. त्यावेळीं प्रमुख कारखानदार आपल्या मालाच्या नमुन्यांचें प्रदर्शन मांडतात व घाउक व्यापारी ऑर्डरी नोंदवितात. अमेरिकेंत खपणाऱ्या खेळण्यांपैकीं शेकडा ९० अमेरिकेंतच बनविलेलीं असतात. आयात होणाऱ्या मालापैकीं तीन-चतुर्थांश खेळणीं जपानमधून येतात. जननाचें प्रमाण घटल्यामुळें खेळण्यांस मागणी दिवसानुदिवस वाढणार नाहीं, अशी भीति ह्या धंद्यांतील लोकांस वाटत आहे. तथापि, बालपणांत करमणुकीचे द्वारा मुलांस शिक्षण देण्याचें महत्त्व समाजास पटूं लागलें असल्यानें, खेळण्यांचा खप कायम राहील अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं.

## हिंदी साखरेच्या धंद्याची प्रगति

हिंदुस्थानांतील साखरेच्या कारखान्यांची संख्या गेल्या सहासात वर्षांत कशी झपाट्यानें वाढली आहे व संयुक्तप्रांत आणि बिहार ह्यांमध्यें त्यांची कशी गर्दी झाली आहे हें खालील कोष्टकावरून ध्यानांत येईल:—

| प्रांत | एकूण साखर कारखाने | | | |
|---|---|---|---|---|
| | १९३१-३२ | १९३३-३४ | १९३५-३६ | १९३७-३८ |
| संयुक्तप्रांत | १४ | ५९ | ६७ | ७२ |
| बिहार | १२ | ३३ | ३५ | ३३ |
| पंजाब | १ | ५ | ४ | ६ |
| मद्रास | २ | ४ | ८ | ११ |
| मुंबई | २ | ४ | ६ | ६ |
| बंगाल | ... | २ | ६ | ९ |
| ब्रह्मदेश | १ | १ | २ | ३ |
| देशी संस्थानें | ... | ४ | ९ | ११ |
| एकूण | ३२ | ११२ | १३७ | १५४ |

## वीज कंपन्यांच्या नफ्यावर नियंत्रण

ना. लठ्ठे ह्यांनीं मुंबई प्रांतिक कायदे मंडळास ऑगष्ट १९३७ मध्यें अंदाजपत्रक सादर केलें, त्यावेळीं वीज कंपन्यांसारख्या सार्वजनिक उपयुक्ततेच्या मंडळ्यांचे व्यवहार नियंत्रित करून त्यांचे नफ्यांत जनतेस सहभागी करण्याचें सरकारी धोरण त्यांनीं जाहीर केलें होतें. ह्या बाबतींत पूर्वचौकशी करून, विजेचे दर किती खालीं आणतां येणें शक्य आहे व वीज कंपन्यांवर किती करभार सयुक्तिक होईल, ह्याची सरकारास कल्पना यावी, याकरितां मुंबई सरकारनें प्रत्येक वीज कंपनीचे हिशेब स्वतंत्रपणें तपासून घेण्याचें ठरविलें आहे. श्री. दास गुप्ता ह्यांची वरील कामावर नेमणूक झाली आहे. सुमारें ६८ कंपन्यांचे हिशेब त्यांस तपशीलवार पहावे लागतील.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner POONA, 2.

The Co-operators' Book Depot.
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

पत्ता बदलला
मराठी केन्द्र
ही
१ जानेवारी १९३८ पासून
२९२, सदाशिव पेठ, ट्रेनिंग कॉलेजजवळ गेली आहे.

ऑफिस सुपारी— आपल्या कुटुंबांत आरोग्यदायक, भरपूर मसाल्याची, 'स्वादिष्ट सुपारी' वापरा. बिनकिडकी सुपारी व निर्भेळ मसाला वापरल्याबद्दल खात्री करा.
म. गो. कुळकर्णी आणि मंडळी,
किराणा दुकानः—पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें २

## हिंदी शेतकऱ्यांचें ऋणविमोचन

( "अर्थ"च्या ता. २९ डिसेंबरच्या अंकांत मध्यप्रांतांतील कर्जाच्या तडजोड बोर्डाची माहिती आली आहे. खाली पंजाब प्रांताविषयी माहिती देत आहों. )

### पंजाब

पंजाब रिलीफ ऑफ इन्डेटेडनेस ॲक्ट एप्रिल, १९३५ मध्यें अंमलांत आला. त्यांतील बोर्डाची योजना मध्यप्रांतांतील बोर्डाच्या तत्त्वावरच आखलेली आहे, परंतु तपशीलांत मात्र फरक आहे. सहकारी सोसायट्यांनीं दिलेल्या कर्जाची तडजोड पंजाब प्रांतामध्यें करतां येत नाहीं. ऋणको सभासदांच्या हिताचें रक्षण सरकारी सहकारी खातें दक्षतेनें करीत असल्यानें, सोसायट्यांचें कर्ज तडजोडीच्या कक्षेबाहेर ठेवण्यांत आलेलें आहे असें त्याचें समर्थन करण्यांत येतें. १० हजारांखालील कर्जाची तडजोड करण्याचा अधिकार बोर्डास आहे; मध्यप्रांतांत ही मर्यादा सध्या २५ हजार रु. आहे. बोर्डाचा अध्यक्ष बहुधा सेवानिवृत्त सरकारी अधिकारी असतो व एक सभासद धनकोंचा प्रतिनिधि व एक सभासद ऋणकोंचा प्रतिनिधि असतो. तडजोड केलेल्या कर्जाच्या रकमेचा हुकुमनामा बोर्ड देतें व दिवाणी कोर्टामार्फत त्याची वसुली करावी लागते. एकाद्या धनकोनें ऋणकोचें योग्य म्हणणें अमान्य केलें, तर बोर्ड सद्रहु कर्जाबाबत ऋणकोस एक सर्टिफिकेट देतें. ह्या सर्टिफिकेटाचे आधारावर धनकोनें दिवाणी दावा लावून कर्जाची रकम मिळविण्याचा यत्न केला, तर दाव्याचा खर्च त्याचे स्वतःवर पडतो व सर्टिफिकेटाचे तारखेनंतरच्या मुदती व्याजचे ६ टक्यांपेक्षां ज्यास्त दरानें मिळत नाहीं. बोर्डाचे निकालावर अपील नाहीं.

तडजोड बोर्डाचा फायदा अनेक सावकार घेऊं लागले आहेत. कोर्ट फीची माफी हीहि कमी महत्त्वाची गोष्ट नाहीं. शेतकऱ्यांची दुःस्थिति इतकी तीव्र झाली आहे, कीं सर्व येणें वसूल होणें अशक्य आहे, ही गोष्ट ओळखून सावकार शक्य ती वसुली करण्याचे मार्गांत आहेत. बोर्डामार्फत त्यांस रुपयांत सात आणे मिळूं शकतात. पंजाबांत सावकार व कर्जदार ह्यांमध्यें जातीय तंटे असल्यानें, सामोपचारानें कर्जाची तडजोड होणें अत्यंत आवश्यक आहे. एकंदरीनें पाहातां, तडजोडीचें कार्य उपयुक्त आहे. तडजोड बोर्डाची संख्या वाढविण्यांत यावी, असा ठराव पंजाब असेंब्लीनें जून १९३७ मध्यें केला आहे. पंजाबमध्यें आतां सहकारी सोसायट्यांकडे कर्जाबाबतची मागणी वाढली आहे व नव्या सोसायट्यांच्या स्थापनेविषयीं खटपटी चालू आहेत. ह्या संधीचा फायदा घेतांना त्यांतील धोक्याकडेहि सहकारी खात्यानें लक्ष देणें आवश्यक आहे. सहकारी सोसायट्यांचा व्यवहार तडजोड बोर्डाचे कक्षेबाहेर असणें इष्ट आहे, असाच अनुभव आलेला आहे.

सध्याची १० हजारांची तडजोडीच्या कर्जाची कमाल रकम वाढविण्यांत यावी, तडजोडीच्या ४० टक्के कर्जाची मालकी असणाऱ्या सावकारांच्या मान्यता आवश्यक नसावी, बोर्डाची मुदत एका वर्षाची तीन वर्षें केली जावी, पोस्ट कार्डावर नोटिसा पाठविण्याचा बोर्डास अधिकार असावा, म्हणजे नोटिसा नाकारल्या जाण्याचा संभव कमी होईल, धनकोस व ऋणकोस बंधनकारक होतील असे निकाल देण्याची बोर्डास सत्ता असावी, इत्यादि सुधारणा चालू योजनेंत सुचविण्यांत आल्या आहेत.


SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.







टिळक आयर्न ॲंड स्टील वर्क्स
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,

दि साऊंड बॅंकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बॅंक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेंपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बॅंकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा
स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६०८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.



एच. एच. दि छत्रपति महाराजा
ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील
## जाधव कॉलेज ऑफ
## टेलरिंग ॲन्ड कटिंग
जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू होणार. नांवें नोंदवा.
नवीन माहितीपत्रक मागवा. ४९७ बुधवार, पुणें.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
## झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

## NEW BUSINESS

**Last year 1936-37**
**Exceeds**
**2 CRORES & 82 LAKHS**

## BONUS

PER THOUSAND PER YEAR
On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## माधवाश्रम

**माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.**

हा आश्रम ट्रॅमच्या रस्त्यावर असून रेल्वे स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांवर आहे. जागा मध्यवस्तींत, हवाशीर व लागणारें फर्निचरनें श्रृंगारीत व व्यवस्थित खोल्या असून सरदार, श्रीमंत, विद्यार्थी, व्यापारी, वगैरे उच्च हिंदु लोकांस राहण्यास व भोजनाचे स्वच्छतेमुळें तसेंच. इलेक्ट्रीक लाइट, पंखे ( फर्स्टक्लासमध्यें ) वगैरे सोयी-मुळें जागा अत्यंत शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहाणारांची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

# S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोमाक प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## मोटारींचा विमा

### कायद्याच्या अंमलबजावणींतील अडचणीचे प्रश्न

अलीकडे मोटारगाड्यांची व बसेसची वहातुक मोठ्या प्रमाणावर होत असल्याकारणानें त्यामुळें होणाऱ्या अपघातांस आळा घालणें आवश्यक झालें आहे. अपघातांमध्यें सापडलेल्या उतारूंस व पादचारी लोकांस नुकसानभरपाई फारच क्वचित् मिळते असा अनुभव आहे. ही नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी मोटारवाल्यांवर विम्याची सक्ती करावी, असा अभिप्राय रौटन कमिटीनें दिला आहे, त्यास अनुसरून लवकरच कायदेशीर तरतूद केली जाईल, अशी अपेक्षा आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें अशा प्रकारची सक्ती अंमलांत आहे. तथापि, कायद्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्यें अनेक अडचणी उपस्थित होतात, असें त्याबाबतच्या चर्चेवरून स्पष्ट दिसतें. हिंदुस्थानांतहि हीच अडचण भासणार आहे. खाली दिलेल्या, ग्रेटब्रिटनमधील एका ताज्या निवाड्यावरून ह्या अडचणीचें स्वरूप ध्यानांत येईल:—

मि. कोंबर नांवाच्या एका गृहस्थानें आपल्या गाडीचा विमा उतरलेला होता. गाडीच्या अपघातामुळें उतारूंस अगर पादचारी माणसांस दुखापत झाल्यास कंपनीकडून (जनरल ॲक्सिडेंट, फायर ॲन्ड लाइफ ॲशुअरन्स कॉर्पोरेशन लि.) नुकसानभरपाई मिळण्याची सदरहु विम्यानें तजवीज केली होती. मि. कोंबर ह्यांनीं आपली गाडी मि. पोप ह्या गृहस्थास १० पौंडांस विकली, त्यांपैकीं ५ पौंड सवडीनें मागाहून देण्याचें मि. पोप ह्यांनीं कबूल केलें. ह्या रकमेची भरपाई होण्यापूर्वी मि. पोप ह्यांच्या गाडीस अपघात झाला व त्यामुळें मि. पीटर्स नांवाच्या उतारूस दुखापत झाली. उतारूनें मि. पोप ह्यांजवर दावा लावून ५०० पौंडाचा हुकूमनामा मिळविला; परंतु एवढी रकम भरण्यास मि. पोप हे असमर्थ होते. मि. पीटर्स ह्यांनीं त्यानंतर विमाकंपनीवर नुकसानभरपाईचा दावा लावला. विमाकंपनीनें मि. कोंबर ह्यांच्या नांवानें विमा उतरला होता; मि. पोप ह्यांच्या नांवानें नव्हता व मि. पोप ह्यांच्या निष्काळजीपणाबद्दल कंपनीस जबाबदार धरतां येणार नाहीं, असा कोर्टानें निवाडा दिला.

मि. पोप हे मि. कोंबर ह्यांच्या अनुमतीनें गाडी चालवीत होते हें खरें असलें तरी त्याबाबतची मि. कोंबरवरील कायदेशीर जबाबदारी त्यांची मोटारीवरील मालकी संपल्यानंतर उरत नाहीं, असें कोर्टानें स्पष्ट सांगितलें. मोटारीची पूर्ण किंमत त्यांस मिळाली नसली तरी तिची मालकी दुसऱ्याचे ताब्यांत गेली होती हें उघड आहे. विम्याच्या पॉलिसीमुळें मिळणारा फायदा दुसऱ्याचे नांवानें लिहून देतां येतो व त्याप्रमाणें मि. कोंबर ह्यांनीं आपली पॉलिसी मि. पोप ह्यांस बेचन केली होती. परंतु विमा कंपनीकडे त्याची नोंद झालेली नसल्यानें बेचनपत्राचा कांहीं उपयोग झाला नाहीं व मि. पीटर्स ह्यांस कंपनीकडून नुकसानभरपाई मिळूं शकली नाहीं.

मोटारींच्या विम्याबाबतचे कायद्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणींत वरील प्रकारचे अनेक भानगडीचे प्रश्न वारंवार उपस्थित होत असतात. कित्येक प्रसंगीं अपघातांत सापडलेल्या मनुष्यास कायद्याचें संरक्षण मिळूं शकत नाहीं व विमा कंपन्या कायद्यामधून अगदी स्वतःस अनुकूल असा अर्थ काढण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. हिंदुस्थानांत विमा कायद्याची योजना झाली म्हणजे असेच प्रश्न उद्भवतील ह्यांत संशय नाहीं. तथापि इतर ठिकाणच्या अनुभवावरून वेळींच बोध घेतां आल्यास बरें होईल.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १२०—८ |
| ५% (१९३९–४४) लोन ... ... ... | १०४–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८– ६ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९८—८ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट (विगर गॅरंटी व लांब मुदत) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षं मुदत) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४६—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ६% ... | २३—८ |
| इंपीरिअल बँक (५०) १२% ... ... | १६०५—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक (५०) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १२४—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर (१००) ४½% ... ... | ९६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९५८–१२ |
| तापी व्हॅली (५००) ७½% ... ... ... | ७६२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% ... ... | ११९—० |
| कराची (१००) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १४४५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १५०५—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४–६¾ |
| चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ४८—८ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—९ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | ११—० |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | ११—४ |

## महाराष्ट्र कारखानदार परिचय

लोकमान्य स्वदेशी समितीमार्फत निघणार असलेल्या पुणें महाराष्ट्र कारखानदार परिचय ग्रंथाचें काम झपाट्यानें सुरू झालें आहे व पुस्तक फेब्रुवारी अखेर प्रसिद्ध होईल. सर्व कारखानदारांस अशी जाहीर विनंती आहे कीं, त्यांनीं कृपा करून आपल्या कारखान्याची माहिती सदर पुस्तकांत घालण्याकरितां सत्वर अवश्य पाठवून द्यावी. ज्यांना आमचीं पत्रकें मिळालीं नसतील त्यांनीं कृपा करून पुढील पत्त्यावर आजच कार्ड टाकून माहिती मागवावी.

पत्ता:—इंटर नॅशनल ट्रेड डिरेक्टरी पब्लीशर्स,
७२८ बुधवार पेठ, पुणें शहर.

वन्देमातरम
शिकाकई
साबू

स्टॉकिस्ट : मा. गो. कुलकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २

— मनपसंत काम —

वक्तशीर-पणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी

सदाशिव हौदानजिक, पुणें.


## गव्हाचे पोहे

(REGD.) ( BLOSSOM ) (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून यांचा उपयोग हित-कारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव, पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.



## गरम झरा वापरल्यास
## तुमचे " शेकडों " रुपये वांचतील.

सचित्र पत्रकासाठीं आजच लिहा.

शिवाजी कारखाना लि. टिकेकरवाडी. ( सोलापूर )

एजंटः—मे. केळकर ब्रदर्स, बुधवार चौक, पुणें सिटी.




पुणे एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

## भारतीय अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये

प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकास आढळेल.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४११३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.